


#StayAware #StaySafe

जर आपल्याला रिझर्व्ह बँकेच्या किंवा इतर संस्थेच्या नावाने मोठी रक्कम मिळण्याबाबत संदेश (लॉटरी/कर परतावा) मिळाला तर त्यावर विश्वास ठेवू नका. तसेच ही रक्कम मिळण्यासाठी आपला खाते क्रमांक किंवा इतर माहिती देवू नका. किंवा कुठलीही रक्कम जमा करू नका.अशा संदेशाकडे दुर्लक्ष करा.

**RBI** सांगते...
जागरूक रहा,
सतर्क रहा.



#StayAware #StaySafe

आपला ओटीपी, पीन किंवा कार्ड ची माहिती कोणालाही शेयर करू नका. धोकेबाज KYC अद्यावत करण्यासाठी किंवा इतर कारण सांगुन वरील माहिती मागू शकतात. तुम्हाला लिंक पाठवूण किंवा बँक अथवा आरबीआई चा कर्मचारी असल्याचे सांगुन आपली वैयक्तिक माहिती काढून घेऊ शकतात व आपल्या खात्यातून पैसे काढून घेऊ शकतात. सावधान रहा आणि अफरातफरी पासून दूर रहा.

RBI सांगते... जागरूक रहा, सतर्क रहा.


**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**

अफरातफरीपासून आपले नुकसान मर्यादित ठेवण्यासाठी आपल्या आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत कार्डावरील व्यवहाराची सिमा मर्यादित ठेवा. ऑनलाइन आणि खरेदी-विक्री व्यवहाराची दैनिक मर्यादा निश्चित करू शकतात. ही सुविधा मोबाइल app, इंटरनेट बँकिंग, एटीएम द्वारे सुरु किंवा बंद करता येते तसेच याद्वारे आपण आपला खर्च व नुकसान दोन्हीही मर्यादित ठेवू शकता.

RBI सांगते... जागरुक रहा सतर्क रहा.

**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**




आपण आपल्या बँक खात्यासाठी व लॉकर साठी नॉमिनीची नोंदणी आवश्य करा. बँक खात्याचे नामांकन केल्याने खातेधारकाच्या  मृत्यू नंतर खात्यातील रक्कम काढने सुलभ होते.
RBI सांगते... जागरूक रहा, सतर्क रहा.
RBI Kehta Hai...
Jaankaar Baniye,
Satark Rahiye!



जर आपल्याला बॅंकेने विमा पॉलिसी किंवा अन्य वित्तीय सुविधा दिली असेल व ती सेवा न मागता पुरवली असेल, जी आपल्या साठी उपयुक्त नसेल किंवा जिच्या महत्वपूर्ण अटींबाबत पूर्वकल्पना दिली नसेल तर आपण आपल्या बॅंकेत तक्रार नोंदवू शकता. जर आपण बॅंकेच्या उत्तराशी सहमत नसाल तर RBI च्या लोकपालांकडे लिखित अथवा आरबीआई च्या तक्रार व्यवस्थापन प्रणाली (सीएमएस) पोर्टलवर तक्रार नोंदवू शकता.

RBI सांगते... जागरूक रहा, सतर्क रहा.

**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**

जर आपली बँक, गैर बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी) किंवा सहभागी पेमेंट सिस्टीम ( ई-वॉलेट चे प्रदाता) ने एक महिन्या पर्यंत आपल्या तक्रारीची दखल घेतली गेली नसेल किंवा त्यांचे उत्तर समाधानकारक नसेल तर आपण आरबीआई च्या लोकपालांकडे तक्रार व्यवस्थापन प्रणाली (सीएमएस) पोर्टल वर तक्रार नोंदवू शकता.

RBI सांगते... जागरुक रहा, सतर्क रहा.

**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**






एटीएम मशीन द्वारे केलेला व्यवहार असफल झाल्यावर निर्धारित वेळेच्या आत आपल्या खात्यातून डेबिट झालेले पैसे जर बॅंकेने पुन्हा परत खात्यात जमा केले नाहीत तर बँके कडून नुकसान भरपाई दिली जाते. जर बँकेने अशा प्रकारची नुकसान भरपाई स्वतःच दिली नाही तर आपण आरबीआई च्या लोकपालांकडे तक्रार व्यवस्थापन प्रणालीच्या (सीएमएस) पोर्टल वर तक्रार नोंदवू शकता.

RBI सांगते… जागरुक रहा, सतर्क रहा.

**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**


आपल्या बँक खात्यातील व्यवहारांबाबत त्वरीत माहिती (अलर्ट) मिळण्यासाठी आपल्या बँकेत आपला मोबाइल नंबर आणि ई मेल रजिस्टर करा. जर आपण न केलेल्या व्यवहारां बाबत किंवा अनधिकृत व्यवहारांबाबत अलर्ट मेसेज आला तर त्वरीत आपल्या बँकेच्या निदर्शनास आणून द्या.
RBI सांगते… जागरुक रहा, सतर्क रहा.
RBI Kehta Hai...
Jaankaar Baniye,
Satark Rahiye!



ऑन लाईन बँक व्यवहार करताना आपल्याला काही खबरदारी बाळगली पाहिजे. जसे कि, आपला मोबाइल फोन, ई मेल किंवा पर्स मध्ये महत्वपूर्ण बँकिंग डेटा ठेवू नका.

RBI सांगते… जागरुक रहा, सतर्क रहा.

**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**




ऑनलाइन बँकिंगसाठी फक्त पडताळणी केलेल्या, विश्वसनिय आणि सुरक्षित ( अर्थात https: ) ने सुरु होणाऱ्या वेबसाइटचा उपयोग करा. बँकिंग व्यवहारांसाठी सार्वजनिक, खुल्या किंवा मोफत नेटवर्कचा वापर करू नका.

RBI सांगते… जागरुक रहा, सतर्क रहा.

**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**




आपला OTP/ CVV/ ATM पीन कोणालाही सांगू नका.

थोड्या – थोड्या कालावधीनंतर आपल्या ऑनलाइन बँकिंगचा पासवर्ड आणि पीन बदलत रहा. आपले ATM कार्ड, क्रेडिट किंवा प्रीपेड कार्ड जर गहाळ झाल्यास त्याला तत्काळ बंद करा.

RBI सांगते… जागरुक रहा, सतर्क रहा.

**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**


जर आपल्या लक्षात आले की कोणीतरी तुमच्या खात्यातून पैसे काढून घेतले आहेत तर त्वरित त्याची तक्रार आपल्या बँकेकडे नोंदवा आणि बँकेकडून त्याची पावती न विसरता घ्या. अशी तक्रार मिळाल्या पासून 90 दिवसाच्या आत तक्रारीचे निवारण बँकेला करावे लागेल.
RBI सांगते जानकार बना, सतर्क रहा.
RBI Kehta Hai...
Jaankaar Baniye,
Satark Rahiye!



जर आपल्या निष्काळजीपणामुळे पासवर्ड, पीन किंवा ओटीपी कोणाला सांगितला गेला असेल आणि फसवणूक झाली असेल, तर जो पर्यंत त्याची तक्रार आपण बँकेकडे नोंदवत नाही तो पर्यन्त आपलेच नुकसान होत राहील. तक्रार नोंदवल्या नंतरही काही नुकसान झाले तर त्याची भरपाई बँकेला करुन द्यावी लागेल. त्यामुळे तक्रार नोंदवण्यास विलंब करू नका.

शुभस्य शिघ्रम !

RBI सांगते जानकार बना, सतर्क रहा

**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**



जास्त परताव्याची अपेक्षा केली की जोखिम वाढते. त्यामुळे कोणत्याही जलद आणि जास्त परतावा देणाऱ्या योजनांच्या मोहाला बळी पडू नका. पैशांची गुंतवणूक विचारपूर्वक करा.

RBI सांगते जानकार बना, सतर्क रहा

**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**



कोणत्याही योजने मध्ये पैसे गुंतवण्याआधी त्या योजनेचा चांगल्या प्रकारे अभ्यास करा. जलद आणि जास्त परतावा देण्याचे वचन देणाऱ्या अनियंत्रित संस्थाच्या प्रलोभनाला बळी पडू नका. यामुळे फसवणूक होऊ शकते.

RBI सांगते जानकार बना, सतर्क रहा

**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**

कोणत्याही जमा योजनेत गुंतवलेले पैसे परत मिळण्यात अडचण येत असेल तर त्या संस्थे विरूद्ध तक्रार आपण आरबीआई च्या “सचेत” पोर्टल वर नोंदवू शकता.

RBI सांगते जानकार बना, सतर्क रहा.

**RBI Kehta Hai...**
**Jaankaar Baniye,**
**Satark Rahiye!**

